सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत कर्मचाऱ्यांचा खाकी गणवेश; आजपासून अंमलबजावणी

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

राज्यातील नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी खाकी रंगाच्या गणवेशास मान्यता दिली. यामध्ये टोपी निळ्या रंगाची असून, त्यावर सुरक्षा रक्षक मंडळाचा लोगो व नाव असणार आहे. त्याचबरोबर कामगार दिनाचे औचित्य साधून हा खाकी गणवेश दिनांक १ मे २०२५ पासून राज्यभरात अंमलात येणार असल्याची घोषणा मंत्री फुंडकर यांनी केली.

महाराष्ट्र राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण आज कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते आज नरिमन भवन, मुंबई येथे करण्यात आले.

सुरक्षा रक्षकांच्या गणेशाच्या रंग खाकी असावा, अशी मागणी विविध संघटना व सुरक्षारक्षकांनी शासना कडे केली होती. कामगार मंत्री यांनी ही मागणी मान्य करत केली आहे. राज्यभरात जिल्हानिहाय १६ सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत असून आता १ मे पासून राज्यातील सर्व सुरक्षा रक्षकांच्या गणवेशात एकसमानता असणार आहे. या उपक्रमामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसंध राहील व त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचेही कामगार मंत्री ॲड.फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

रायगडच्या पालकमंत्रिपदावरुन राजकीय संघर्ष तीव्र महाराष्ट्र दिनी ध्वजवंदनावरुन नवा वाद

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना (शिंदे गट) चे मंत्री भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या मंत्री आदिती तटकरे यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या वादात महाराष्ट्र दिनी ध्वजवंदन कार्यक्रमाने नव्याने पेट घेतला आहे.

राज्य शासनाच्या अधिकृत परिपत्रकानुसार रायगड जिल्ह्यातील ध्वजवंदन सोहळा आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे. या घोषणेनंतर गोगावले यांना पालकमंत्रिपदाच्या शर्यतीतून मागे टाकल्याची चर्चा रंगली असून, यामुळे त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "ध्वजवंदनाचा अधिकार म्हणजे पालकमंत्रिपद नव्हे. मी रायगडचा मावळा आहे; तलवार म्यान केलेली नाही."

राजकीय कुरघोडी की प्रशासनिक निर्णय?

रायगडचे पालकमंत्री आपणच होणार असल्याचे भरत गोगावले यांनी अनेक वेळा जाहीर केले होते. मात्र अद्याप त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा न झाल्याने

त्यांच्या भूमिकेला सुरुंग लागल्याचे चित्र आहे. दुसरीकडे, आदिती तटकरे यांना झेंडावंदनाची जबाबदारी देऊन सरकारने एकप्रकारे त्यांच्याच पारड्यात वजन टाकल्याचे संकेत दिले आहेत, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

शिंदे सरकारचं डावपेचीय राजकारण?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारमध्ये जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून अनेक नेते नाराज आहेत. यामध्ये भरत गोगावले यांचा समावेश असून, त्यांच्या सारख्या स्थानिक प्रभावशाली नेत्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होतो आहे.

राज्यात इतर जिल्ह्यांतील झेंडावंदनासाठी नेत्यांची यादी

महाराष्ट्र दिनी राज्यभरात होणाऱ्या झेंडावंदन कार्यक्रमासाठी मंत्र्यांची यादी प्रसिद्ध झाली असून, ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुण्यात अजित पवार, नागपूरमध्ये बावनकुळे, मुंबईत मंगलप्रभात लोढा, नाशिकमध्ये गिरीश महाजन अशा प्रमुख नेत्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. रायगडसाठी आदिती तटकरे यांचं नाव आल्यानेच हा वाद उफाळला.

राजकीय वर्तुळातील खळबळ

राजकीय निरीक्षकांच्या मते, ध्वजवंदन ही एक प्रतीकात्मक परंतु महत्त्वाची जबाबदारी असते आणि कोणत्याही मंत्र्याला ही जबाबदारी देणे, हा त्या जिल्ह्याच्या नेतृत्वासाठीचा संकेत मानला जातो. त्यामुळे गोगावले यांची नाराजी समजण्यासारखी असून, हे केवळ प्रशासकीय नियोजन नव्हे तर राजकीय डावपेचही असू शकतो.

राजकीय संघर्षाचा शेवट कधी?

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा तिढा केव्हा सुटेल, हे स्पष्ट नाही. पण महाराष्ट्र दिनी झेंडावंदनाच्या निमित्ताने उभा राहिलेला हा वाद राजकीय रणधुमाळी आणखी तीव्र करेल, हे निश्चित.

जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे अजित पवार यांच्याकडून स्वागत, सामाजिक समतेसाठी क्रांतीकारी पाऊल

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

केंद्र सरकारने आगामी जनगणनेत जातनिहाय जनगणना करण्याचा घेतलेल्या निर्णयाचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर स्वागत केले आहे. या निर्णयामुळे सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय वेगाने साध्य होईल आणि भविष्यात जातव्यवस्था संपुष्टात येण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, या क्रांतीकारी निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळाचे त्यांनी आभार मानले आहेत.

जातनिहाय जनगणनेच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, "हा निर्णय सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे सरकारला मागास समाजघटकांसाठी अधिक निधी देऊन त्यांचा शैक्षणिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल. सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळेल आणि सामाजिक समतेच्या दिशेने एक मोठे पाऊल पडेल." या निर्णयाला त्यांनी सामाजिक समतेसाठी केंद्र सरकारने टाकलेले क्रांतीकारी पाऊल असे संबोधले.

पवार पुढे म्हणाले, "गेल्या अनेक दशकांपासून अनेक व्यक्ती, संस्था आणि संघटना जातनिहाय जनगणनेची मागणी करत होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासारख्या संवेदनशील नेतृत्वामुळे ही मागणी पूर्ण झाली. आतापर्यंत अनुसूचित जाती, जमाती वगळता इतर जातींची आर्थिक आणि सामाजिक माहिती उपलब्ध नव्हती, ज्याचा फटका ओबीसींसह इतर समाजघटकांना बसत होता. आता या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना योग्य समाजघटकांपर्यंत पोहोचतील आणि सर्वांना समान संधी मिळतील." यामुळे भविष्यात जातव्यवस्था संपुष्टात येण्यासही मदत होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या निर्णयामुळे सामाजिक समतेसाठी नवे दालन खुले होईल, अशी अपेक्षा राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्वागत

समतेचा विचार अधिक बळकट होईल – जयंतराव पाटील

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना घेण्याच्या निर्णयाला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय ऐतिहासिक असून यामुळे देशातील समतेचा विचार अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने होत होती. समाजातील विविध घटकांचे अचूक सामाजिक आणि आर्थिक चित्र समोर यावे, त्यांच्या गरजा समजून सरकारने योजनांची आखणी करावी यासाठी ही जनगणना अत्यावश्यक असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले.

"मी या निर्णयाचा सहर्ष स्वागत करतो. आम्ही अनेक वेळा केंद्र सरकारकडे जातनिहाय जनगणनेची मागणी केली होती. आता सरकारने ती मान्य केली हे स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे देशात समतेचा विचार आणखीन बळकट होईल," असे त्यांनी म्हटले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली हा विषय अनेकदा संसद आणि विविध मंचांवर मांडण्यात आला होता. त्यामुळे आता या निर्णयामुळे देशातील मागास आणि वंचित घटकांच्या प्रगतीसाठी योग्य पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सागरी प्रकल्प, बंदरे, जेट्टी परिसरात अवैध बांगलादेशी आणि पाकिस्तानी नागरिक आढळल्यास कसून चौकशी करा – मंत्री नितेश राणे

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील सागरी सुरक्षेच्या दृष्टीने सावधगिरी बाळगणे अत्यावश्यक असल्याने राज्यातील सर्व सागरी प्रकल्प, बंदरे, जेट्टी आणि मत्स्य व्यवसायाशी संबंधित ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कामगारांची कसून चौकशी करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज दिले. सागरी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या व्हीसीद्वारे आढावा बैठकीत मंत्री राणे बोलत होते. महाराष्ट्राला लाभलेल्या 720 किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी सखोल तपासणी आणि कठोर कारवाई आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः गेटवे ऑफ इंडिया ते अलिबाग आणि एलिफंटा मार्गावरील फेरी सेवा आणि ससून डॉक परिसरात अवैध बांगलादेशी नागरिक मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याची माहिती मिळाल्याने तो परिसर अत्यंत संवेदनशील असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

मंत्री राणे यांनी सागरी सुरक्षा पोलीस महानिरीक्षक, कोकण विभागाचे पोलीस अधिकारी आणि सागरी मंडळाच्या अधिकाऱ्यांना निर्देश देताना सांगितले की, बंदरे व सागरी प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सर्च ऑपरेशन व कोंबिंग ऑपरेशनद्वारे चौकशी करण्यात यावी. ओळखपत्र, आधार कार्ड यांची पडताळणी करावी आणि सर्व व्यक्तींना पोलीस पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य करावे. तसेच ससून डॉक परिसरातील बोट चालक, फेरी चालक, कामगार, आणि इतर कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी. यासंदर्भात तातडीने नोटीस काढून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात, असेही मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, राज्याचे मत्स्य व्यवसाय आयुक्त किशोर तावडे, कोकण विभागाचे पोलीस महानिरीक्षक दराडे, सागरी सुरक्षा पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत आणि मुंबई पोर्ट झोनचे पोलीस उपायुक्त ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने धोका टाळण्यासाठी सरकार अधिक सजग असून, कोणताही संशयास्पद हालचाल किंवा अवैध व्यक्ती आढळल्यास त्वरित कारवाई करण्यात येईल, असे मंत्री राणे यांनी बैठकीच्या समारोपाला सांगितले.

फडणवीस पीक विमा पॅटर्न शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक योजना रद्द करा नाहीतर काँग्रेस रस्त्यावर – हर्षवर्धन सपकाळ

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

भाजप युती सरकारने पीक विमा योजनेत केलेला नव्या प्रकारचा 'फडणवीस पीक विमा पॅटर्न' हा शेतकऱ्यांच्या विरोधात असून तो अन्यायकारक आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. २५ वर्षांपासून सुरू असलेली पारंपरिक विमा योजना अचानक बंद करून, नवा पॅटर्न लागू करणे शेतकऱ्यांचे नुकसान करणारे असल्याचा इशारा त्यांनी दिला. जुनी योजना पुनश्च सुरू करावी अन्यथा काँग्रेस व शेतकरी गप्प बसणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ म्हणाले, शासनाने नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान व काढणीपश्चात नुकसान भरपाई देणारी पद्धत रद्द करून केवळ पीक कापणी अहवालाच्या आधारावर नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदतीऐवजी पुढच्या हंगामातच भरपाई मिळणार असून, त्यांचे कर्जबाजारीपण वाढणार आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकरी या नव्या पद्धतीने अधिक त्रस्त होतील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. सपकाळ यांनी शेतकऱ्यांना एक रुपयात विमा मिळावा, यासाठी विमा कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे सांगितले. शासनाने नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान 'राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी' किंवा 'राज्य आपत्ती निवारण निधी'तून भरून काढावे, अशी मागणीही त्यांनी केली. बीड पॅटर्नप्रमाणे ८०-११० टक्के नुकसान भरपाई द्यावी आणि त्याहून अधिक नुकसान असल्यास ती शासनाने स्वत: भरून काढावी, अशी शिफारसही त्यांनी केली.

याशिवाय, सुप्रीम कोर्टाने कारवाईचे निर्देश दिलेले मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा राजीनामा सरकार कधी घेणार, असा सवालही त्यांनी केला. तसेच पोलीस विभागात वरिष्ठतेचे नियम मोडून देवेन भारती यांना बढती देण्यात आली, ही "लाडक्या अधिकाऱ्यांची योजना" असल्याचा आरोप करत त्यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भाजपा सरकारची शेतकरी विरोधी मानसिकता दिवसेंदिवस उघड होत असल्याचेही ते म्हणाले.

MKCL कडून कृत्रिम बुद्धिमत्ता समाविष्ट करून कोर्सचे अपग्रेडेशन -डिजिटल व AI Divide दूर करण्याचा निर्धार

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) ने आपला लोकप्रिय MS-CIT कोर्स आता कृत्रिम बुद्धिमत्तेने (AI) सुसज्ज करत 'MS-CIT – AI Powered' या नावाने नव्याने सुरू केला आहे. गेल्या दोन दशकांपासून महाराष्ट्रासह देशभरात 1.65 कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेल्या या कोर्समध्ये आता 100 हून अधिक AI टूल्स व 400 पेक्षा अधिक कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे. Digital Divide कमी होत असतानाच आता AI जाणणारे आणि न जाणणारे अशी नवी दरी तयार होत आहे. ही दरी भरून काढण्यासाठी MKCL ने हा कोर्स नव्याने तयार केला आहे. ChatGPT, Google Gemini, Microsoft Copilot यांसारख्या टूल्सचा वापर, सायबर सुरक्षा, डेटा विश्लेषण, डिजिटल व्यवहार, आणि AI वापरून अभ्यासात किंवा कामात कशी मदत मिळवता येईल, याचे प्रशिक्षण या कोर्समध्ये दिले जात आहे. राज्यातील 4500 हून अधिक अधिकृत केंद्रांमधून हा कोर्स शहरी आणि ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. संगणक साक्षरतेबरोबरच नवयुगातील तंत्रज्ञान कौशल्ये देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक, गृहिणी, शिक्षक, व्यावसायिक, स्टार्टअप सुरू करणारे तरुण तसेच नोकरीच्या शोधात असलेले युवक/युवती यांच्यासाठी हा कोर्स उपयुक्त आहे. 10वी व 12वीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनीही ही संधी न गमावता नव्या युगातील पहिलं स्मार्ट पाऊल उचलावे, असे आवाहन MKCL कडून महाव्यवस्थापक नटराज कटकधोंड, मुंबई विभाग समन्वयक इंद्रनील मयेकर यांच्याकडून करण्यात आले आहे.यावेळी MKCL चे विविध पदाधिकारी देखील उपस्थित होते.

धरणातील पाणीसाठा समाधानकारक

संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन करा : मुख्यमंत्री

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

राज्यातील धरणांमध्ये सध्या समाधानकारक पाणी साठा असूनही, आगामी संभाव्य परिस्थितीचा विचार करून जलसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनासाठी नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले.

या बैठकीत जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी धरणांतील पाणीसाठा व पाणी पुरवठ्याचा आढावा सादर केला. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सद्यस्थितीत जरी पाणी साठा समाधानकारक असला, तरी खबरदारी म्हणून नियोजन करण्यावर भर दिला. मुख्यमंत्री म्हणाले की, "राज्यात पाणी टंचाई जाणवत असलेल्या गावांमध्ये सध्या टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या लक्षणीयरीत्या कमी आहे. उदाहरणार्थ, २०२४ मध्ये याच कालावधीत २५६४ टँकर कार्यरत होते, तर सध्या ही संख्या फक्त ७९६ इतकी आहे. बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २६३ टँकर सुरू होते, तर यंदा एकाही टँकरची गरज भासलेली नाही." राज्यातील १८ जिल्ह्यांतील ६४४ गावे आणि २०५१ वाड्यांमध्ये सध्या ७९६ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू असल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. ठाणे,

रायगड, पालघर, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, अमरावती, वाशिम, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये टँकर पुरवठा सुरू आहे.

यामध्ये छत्रपती संभाजीनगर महसुली विभागात सर्वाधिक म्हणजे २७५ टँकर कार्यरत आहेत. फक्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच १९२ टँकरने पाणी पुरवठा होत आहे.

मागील वर्षी याच कालावधीत २०२६ गावे व ४९७२ वाड्यांमध्ये २५६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता.

ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
Mobile: +91-8433508283 | Website: www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचे लोन क्र. **APPL00000452** आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) ब्लिंडिया फिटआउट प्रा.लि. (कर्जदार) गाला क्र. जी१९६, एक्सप्रेस झोन, बी विंग, पटेल वानिकाच्या पुढे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव पूर्व, मुंबई–४०००६३	
सह–कर्जदाराचे नाव: (२) श्री रामसुरत बाबुलाल विश्वकर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्र. ६०८, स्वप्नकिरण इमारत क्र. २ अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७ (३)सौ. शारदादेवी रामसुरत विश्वकर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०८, स्वप्नकिरण इमारत. क्र. २ अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७ (४) श्री संदीप कुमार विश्वकर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०८, स्वप्नकिरण इमारत क्र. २ अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७	
मालमत्तेचा पत्ता:– फ्लॅट क्रमांक १८०५, १८वा मजला, बी विंग, इमारत क्रमांक ०२, माऊली ओंकार, वैशेत पाडा, लक्ष्मण नगर रोड क्रमांक २, सीटीएस क्रमांक ७०१७/१अ/१/१ (पीटी) आणि ७०१७/१अ/१/१ (पीटी) ते ३० मालाड चे गाव, मालाड (पु), मुंबई ४०००९७	
थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार)	रु. ५९,७७,७६४/– (रुपये एकोणसाठ लाख सत्यातर हजार सातशे चौसष्ट फक्त)
लिलावाची तारीख	१६ मे २०२५
राखीव किंमत	रु.६७,५०,०००/– (रुपये सडूसष्ठ लाख पन्नास हजार फक्त)
बयाणा पैसे ठेव	राखीव किंमतीच्या १०%
किमान बोली वाढीची रक्कम	रु. १०,०००/–
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ	९ मे २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वा
केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ.	१४ मे २०२५ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह
ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ	१६ मे २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान
टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.	

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख: ३० एप्रिल, २०२५ एसडी/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई अधिकृत स्वाक्षरी

महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यपालांचे वाणिज्यदूतांसाठी चहापान

70 देशांमधील राजदूतांची पहलगाम अतिरेकी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी

दिनांक १ मे रोजी साजरा होत असलेल्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचे औचित्य साधून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध देशांच्या मुंबईतील वाणिज्यदूत व मानद वाणिज्य दूतांसाठी आज राजभवन येथे स्वागत समारोहाचे आयोजन करण्यात आले.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर साधेपणे करण्यात आलेल्या या स्वागत समारोहाचे आयोजन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या पुढाकाराने राजशिष्टाचार विभागातर्फे करण्यात आले.

यावेळी राज्यपालांसह उपस्थित ७० देशांच्या वाणिज्यदूतांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातील मृतांना एक मिनिट स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सर्व वाणिज्यदूतांची भेट घेतली व शुभेच्छा दिल्या.

स्वागत समारोहाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे प्रशासक भूषण गगराणी यांसह विविध विभागांचे ज्येष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रगीत व राज्यगीत झाल्यानंतर राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांच्यावतीने उपस्थित वाणिज्यदूतांचे स्वागत केले.